**विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयाच्या स्टाफ अकॅडमी तर्फे 'ठाण्याच्या पाऊलखुणा' आणि 'युवाशिल्प प्रकाशन सोहळा' कार्यक्रम संपन्न**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिम्मित आजादी का अमृत महोत्सव आणि 'हर घर तिरंगा' अंतर्गत अनेक स्तुत्य उपक्रम महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात आले असून याच अंतर्गत महाविद्यालयाच्या स्टाफ अँकॅडमी तर्फे दिनांक १० ऑगस्ट २०२२ रोजी,सकाळी ११ वाजता ठाण्याच्या पाऊलखुणा आणि युवाशिल्प प्रकाशन सोहळा कार्यक्रम संपन्न झाला. ठाण्याचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास सर्वांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली.

या कार्यक्रमाला जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक,उपप्राचार्य प्रा.सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ महेश पाटील,ग्रंथपाल नारायण बारसे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य संगिता दीक्षित, पर्यवेक्षिका डॉ. संध्या वैद्य, आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. दिपक साबळे, युवाशिल्पचे समन्वयक प्रा. संतोष राणे यांची विशेष उपस्थिती होती.

जोशी बेडेकर महाविद्यालयाचे युवाशिल्प हे वार्षिक महाविद्यालयीन कार्यक्रमांचा आढावा घेणारे,विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देऊन प्रेरणा देणारे आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष म्हणून या युवाशिल्पाचे मुख पृष्ठ हे तिरंग्याने व भारताच्या गानकोकिळा लता मंगेशकर यांना श्रद्धांजली म्हणून मल पृष्ठावर लता दीदी यांचे छायाचित्र अशी रचना करण्यात आली आहे. या युवशिल्पाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, महाविद्यालय नेहमीच काळाशी देशाशी जोडून घेणारे उत्तमोत्तम कार्यक्रम करत असते.त्यांनी महाविद्यालयात होणाऱ्या कार्येक्रमांचे कौतुक केले.

ठाणे शहराला ऐतिहासिक किनार लाभली आहे. तेच उद्दिष्ट घेऊन ठाणे शहराची वैशिष्ट्ये पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यानातून प्रा. डॉ. विमुक्ता राजे यांनी ठाण्यातील प्राचीन गडकिल्ले, तलाव, मंदिरे, खाद्यसंस्कृती, याबाबत एकूणच सर्वांगीण माहिती दिली. डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे ठाण्याच्या राजकीय इतिहासातील पैलू उलगडून दाखवले .
या कार्यक्रमास जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक,शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी सर्वजण उपस्थित होते.
संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा रुपेश महाडिक यांनी पार पाडली व शेफाली कोंडेवार यांनी आभाप्रदर्शन करत कार्यक्रमाची सांगता झाली.

डॉ.विमुक्ता राजे
स्टाफ अँकॅडमी








सर्वांचे

